# सातारा जिल्हा परिषद,सातारा
## पशुसंवर्धन विभाग

इमेल-dahosatara@gmail.com
दुरध्वनी क्रमांक :- ०२१६२-२३३७९३

जा.क्र.पशुसं/तंत्र/ २०३८ /२०२०
पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद,सातारा
दिनांकः- २१/०९/२०२०

प्रति,
मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी(साप्रवि)
सातारा जिल्हा परिषद,सातारा.

**विषयः- जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर जाहीर नोटीस प्रसिध्द करणेबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरुन, पशुसंवर्धन विभाग, सातारा जिल्हा परिषद,सातारा अंतर्गत केंद्र शासनाच्या **राष्ट्रीय कृत्रिम रेतन कार्यक्रम फेज-२(NAIP II)** या योजनेअंतर्गत दि.०१ऑक्टोबर २०२० ते ३१ मे २०२१ किंवा १० महिने (आवश्यकतेनुसार) या कालावधीसाठी डाटा एन्ट्री ऑपरेटरची(Data Entry Operater) तात्पुरत्या स्वरुपात नेमणुक करावयाची आहे. त्यासाठीची जाहिर नोटीसीचा नमुना सोबत जोडला असुन जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेस विनंती आहे.

सोबतः- जाहीर निवेदन व अर्ज नमुना

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी**
**सातारा जिल्हा परिषद,सातारा**

Scanned with CamScanner

Scanned by CamScanner

# सातारा जिल्हा परिषद,सातारा
## पशुसंवर्धन विभाग

इमेल-dahosatara@gmail.com दुरध्वनी क्रमांक :- ०२१६२-२३३७९३

जा.क्र.पशुसं/तंत्र/NAIPII/२०८०/२०२०
पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद,सातारा
दिनांकः- २१/०९/२०२०.

# जाहीर निवेदन

**विषय :- केंद्र शासनाच्या राष्ट्रीय कृत्रिम रेतन कार्यक्रम फेज-२(NAIP II) या योजनेअंतर्गत डाटा एन्ट्री ऑपरेटरची(Data Entry Operater) नियुक्तीबाबत.**

**संदर्भः-** १.मा.आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा.क्र.एफवायपी-२०(२१)/तां-२/सीआर क्र.४४/राकृरेका-२/८०५/२०२०, पुणे दि.०६.०७.२०२०.
२.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी , महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला यांचे पत्र क्र. मपविमं/तां-२/NAIP II/D.E.O/2552/2020, अकोला दि.१६/९/२०२०.
३.या कार्यालयाची मान्य टिपणी दि.१७/०८/२०२०.

पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद,सातारा अंतर्गत केंद्र शासनाच्या **राष्ट्रीय कृत्रिम रेतन कार्यक्रम फेज-२(NAIP II)** या योजनेअंतर्गत दि.०१ऑक्टोबर २०२० ते ३१ मे २०२१ किंवा १० महिने (आवश्यकतेनुसार) या कालावधीसाठी डाटा एंन्ट्री ऑपरेटरची(Data Entry Operater) तात्पुरत्या स्वरुपात नेमणुक करणेत येणार आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | पदांची संख्या | शैक्षणिक पात्रता | एकूण देय मासिक मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | डाटा एन्ट्री ऑपरेटर (Data Entry Operater) | ०१ | १.१२ वी / पदवीधारक उत्तीर्ण असावा.<br>२.शासनमान्य संगणक अभ्यासक्रम उदा.एमएच-सीआयटी उत्तीर्ण असावा. एक्सेल(MS-Excel) मध्ये उत्कृष्ट कामकाज करणाया उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. | र.रु.१०,०००/- (प्रति महिना) |

➢ **वयोमर्यादाः-** दि.०१.१०.२०२० रोजी उमेदवाराचे वय किमान १८ व कमाल ३५ वर्षे असावे.

➢ **निवड पध्दतीः-**

- प्रत्यक्ष मुलाखत घेऊन उमेदवाराची निवड करणेत येईल.
- शैक्षणिक अर्हता व अटी पुर्ण करणाऱ्या उमेदवारांनी दि.२४/०९/२०२० रोजी प्रत्यक्ष मुलाखतीसाठी आपल्या कागदपत्रांसह स्थळ-कृषी व पशुसंवर्धन विषय समिती सभागृह, तिसरा मजला, जिल्हा परिषद,सातारा येथे सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहावे.

Scanned with CamScanner

Scanned by CamScanner

➢ **उमेदवारांना सुचनाः-**

- उमेदवारांनी मुलाखतीवेळी Mask, Sanitizer, Social Distancing यांचा अवलंब करणे बंधनकारक आहे.
- दि.२४.०९.२०२० रोजी सकाळी १०.०० ते ११.०० या वेळेत नांव नोंदणी व सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यामध्ये मुलाखतीचा अर्ज भरुन सादर करावा.
- उमेदवारांनी विहीत नमुन्यामध्ये अलीकडच्या काळातील साक्षांकित पासपोर्ट साईज फोटो मुलाखत अर्जावर जोडणे आवश्यक आहे.
- अर्जासोबत शैक्षणिक पात्रता, व्यावसायिक पात्रता, वय व अनुभव इ. संदर्भातील कागदपत्रांच्या छायांकित साक्षांकित प्रती जोडाव्या.
- सदरची नेमणुक दि.०१ऑक्टोबर २०२० ते ३१ मे २०२१ किंवा १० महिने (आवश्यकतेनुसार) या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात राहील. उमेदवारास नियमित सेवेचा कोणताही लाभ मिळणार नाही. सदर कालावधीनंतर नेमणुक रद्द होईल.
- सदर कालावधीकरता र.रु.१०,०००/- प्रति महिना मानधनाव्यतिरिक्त इतर कोणताही भत्ता देय राहणार नाही.
- सदर मानधन हे पुर्ण हजेरी व समाधनकारक काम केल्यानंतरच अनुज्ञेय राहील. उमेदवाराचे कामकाज असमाधनकारक राहिल्यास, कोणतेही पुर्वसूचना न देता हा नेमणूक आदेश रद्द करणेचे अधिकार राखुन ठेवण्यात आलेले आहेत.
- तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त केलेल्या डाटा एन्ट्री ऑपरेटर (Data Entry Operater) पदासंबंधी सेवा शर्ती, शैक्षणिक अर्हता, एकत्रित ठोक मानधन व नियुक्तीची कार्यपध्दती यासंबंधी आवश्यक ते बदल तसेच निर्णय घेण्याचे अधिकार राखुन ठेवणेत येत आहेत.
- नियुक्तीपुर्वी उमेदवाराकडुन करारनामा करुन घेणेत येईल. तसेच उमेदवारावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा व आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र स्वतंत्रपणे सादर करावे लागेल.

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी**
**सातारा जिल्हा परिषद,सातारा**

Scanned with CamScanner

Scanned by CamScanner